

# शक्तिवचने

आध्यात्मिक
निरूपणात्मक
ग्रंथ

-कुमारी शक्तिलीला(निकिता राजेश पाटील)

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# शक्तिवचने

## रचयिता : निकिता राजेश पाटील

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# शक्तिवचने

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना दाद द्या

ई साहित्य ला आपल्या मित्रांचे मेल पत्ते द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# शक्तिवचने


## निकिता राजेश पाटील

पत्ता : १०९, वांगणी हाईटस्, बदलापूर नेरळ हायवे, पूनम हॉटेलजवळ, वास्तुकार नगर, वांगणी (पूर्व), जि. ठाणे. 421503

फो. न. : ८६८९९५४८०६

e-mail shaktileelanikita@gmail.com



**या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.**

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :
www. esahity.com
www. esahity.in
esahity@gmail.com
eternity, G1102,
eleventh floor,
eastern express highway,
Thane. 400604

प्रकाशन : २३ जुलै २०२१ (गुरुपोर्णिमा १९४३)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# शक्तिवचने

## आध्यात्मिक निरुपणात्मक ग्रंथ

-निकिता राजेश पाटील

## परिचय



निकिता राजेश पाटील.

‘कुमारी शक्तिलीला” या नावाने कविता लेख कथांचे लेखन.

कथालेखन,काव्यवाचन अशा स्पर्धांत सक्रिय सहभाग.

वाङ्मयीन परिचय:-१) संस्कृत चंद्रिका अशा मासिकात श्लोक लेखन.

२)विद्याविकास संस्थेच्या वार्षिकात( सांवत्सरिकात) रौप्य महोत्सवानिमित्त ‘द्रौपदीचे आत्मकथन” हा ललित लेख व “मनाचे प्रदूषण” ही कविता व “बायको नावाचं अजब रसायन” ही विनोदी कथा प्रकाशित.

३) टिळकनगर सांस्कृतिक महोत्सवानिमित्त “द्रौपदीचे स्वगत” ह्या एकपात्री प्रयोगाचे वेशभूषा-प्रयोगलेखन-फार्सलेखन व सादरीकरणाचा एकत्रित मेळ.

४) बदलापूरच्या कविसंमेलनात कविरुपात काव्यवाचन.

५) अस्मिता या हस्तलिखित सांवत्सरिकात “नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर’ या लेखाचे लेखन.

६)मानवविद्या विभागात ‘वाचनसंस्कृती : डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयाचे महत्त्व” या विषयावर संशोधन.

७) निबंध , वक्तृत्व स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक.

वाचन:- मी आजपर्यंत विविध प्रकारची पुस्तके वाचली आहेत. त्यातील सगळ्यात जास्त महाभारताची पुस्तकं आहेत.

👸 👰 👸

# अर्पणपत्रिका

माझ्या गुरू आणि माता असणाऱ्या, अत्यंत सरल भाषेत ज्ञान देणाऱ्या, माझ्यावर नितांत प्रेम करणाऱ्या माझ्या आईला व गुरूला ही शक्तिवचने समर्पित!

. तुझी पुत्री आणि शिष्या,

. कुमारी शक्तिलीला

## मनोदय

मी ध्यानयोगात प्रविष्ट झाल्यानंतर मला विभिन्न ज्ञान प्राप्त होऊ लागले. मी ते अनुभव, कविता व अभंग रूपात व्यक्त करू लागले.

मात्र २०१६ – २०१७ च्या सुमारास माझ्या हाती दासबोध आला.त्यातील निरूपणात्मक शैलीने माझं चित्त वेधून घेतले. आध्यात्मिक ज्ञान व संकल्पना-विकल्पनांविषयी नव्या साधकांना मार्गदर्शन करण्यासाठी निरूपणात्म शैली उत्तम आहे.

मला वाटू लागले, आपणही असेच निरूपणात्मक शैलीने ज्ञान मांडावे. मात्र सर्व काही शक्तीच्या इच्छेनुसार घडते.

२०१२ पासून अभंगांची रचना शक्तीने ममकरवे करवून घेतली, त्यानंतर दासबोध वाचल्यावर मला ८ जून २०१७ पासून शक्तिवचने स्फुरु लागली.

या निरूपणात्मक आध्यात्मिक ग्रंथाचेही श्रेय मी माझ्या गुरू अर्थात आईला देते. कारण तिने दिलेल्या ज्ञानाचे भांडार या शक्तिवचनांत आहे.

# श्री शक्तिवचने

## - कुमारी शक्तिलीला

# ज्ञान बोध

## ज्येष्ठ *द्वादशी*, प्रदोष, शके शालिवाहन १९३९

*(ज्येष्ठाचा 12 वा दिवस, २०१७)*

# श्री शक्तिनिरुपित

## आद्यनमन

दशक पहिले :- सर्वनमन, निरुपण: यथा बुध्दी

श्री शक्तिवचन| शांतपणे करा श्रवन| मनन करोनि वर्तन| समाधान हेच धन| होई तयाचे ||१||

जयाचे प्रेरणे करिते लेखन|तया प्रेरणा मातेस नमन|करिते तिचे स्तवन| शांतपणे श्रवण| करावे||२||

*यत् अपि स्वर्णमयी लङ्का न मे लक्ष्मण रोचते|*

*जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी| रामायण||*

ती माझी गुरु|अध्यात्माची कल्पतरू|

परमार्थप्रपंचाचा महामेरू| सांगे ज्ञानासिंधु|

साऱ्यांत गुरुंत श्रेष्ठ||३||

कधी ठोकोनि पत्रा करी| कधी कल्हई करी|

कधी रेवड भरी । एकदम व्यूढा||४||

तू जननी  करवलेस मजकरवे अध्यात्मगमन|

तवकृपे ज्ञान होते स्फुरण| विकारांचे करतेस

शमन| साऱ्या मातांत महान|तुझे स्तवन
शब्दातीत असावे ॥५॥

परब्रम्हाहूनी श्रेष्ठ| मायेचे भूयिष्ठ | कीर्तीत
सुष्ठ|आहे तवार्हता||६||

पडदा फाडी अज्ञानाचा| प्रकाश पसरवी
निर्गुणाचा|लाजेल हिजपुढे ओज सज्ञानाचा|
धन्य मी हिचे पोटी जातिले|| 7||

तू साऱ्या देवाहूनि कृपाळू| माऊलीहुनी मायाळू| सोर्याहूनी तेजाळू|मेघाहूनी वर्षाळू| प्रेमाचा करी||८||

तू चंद्राहूनि शीतळू| रेशमाहूनि पातळू| कृष्णाहुनि ओढाळू। पूरी निष्पापता||९||

तू गुरूहुनि जडू| वायुहूनी हलडू| तू परमानंदाहूनी द्वाडू| ऐसा खेळ करी||१०||

तू माझा गुरू| प्रभुहूनी महाप्रभु| ज्ञानाचे निरुपण करता सुरु| ऐकत राहावेसे वाटे||११||

न विस्मरावे तव कमलचरण| अर्पावे त्यावरी
माझे जननमरण| कायम तुझे स्तवन|करावेसे
वाटे||१२||

तू माझा परीसु|करशील् सुवर्ण
लोहकीसू|साऱ्यात विशिष्ट निशु| केले
माजे||१3||

आदिशक्तिहूनि श्रेष्ठ| एक तू आदर्श उत्कृष्ठ|
महादेवाने धृष्ट| पहिलेच उदा.||१४||

तू यमाहुनी क्रूर| तू आदित्याहुनी शूर|
क्षमा – सहनशीलतेचा धूर| तू गुडगुडीतून
द्यावे||१५||

गुरूचरनाभ्यां सदा वंदनम्| कदापि मा भूत ते
विस्मरणम्|| ज्ञान तेजसो महान निधिस्त्वं
दयाधनस्त्वं तपो निधिस्त्वम्|अनिशम्
शिष्याहितस्य चिंतनम् गुरुचरणाभ्याम सदा
वन्दनम्||

तव हस्ताभ्यां मम निर्माणम् कदापि मा भूत ते
विस्मरणम्|| डॉ. कमल अभ्यंकर

तू ज्ञान तेजाचा निधि अपारू| तू उघडून दाखविते सारू| ते ओळखाया शिकविलेस परब्रम्ह निराकारू| अ आई पासून शिकवलेस प्रबंध||१६||

तू  जन्मभूमिहूनि वरु| साडे आठ महिने वेदना सोसूनी सांभाळले गर्भकोठारू| वर्षानुवर्षे प्रेमाची साथ देऊनि सांभाळले मम

जीवनाकारू| कसे फेडू तुझे उपकारू| प्रेम वाढवूनि||१७||

आखिर तुझे स्तवन| करिता वेदही जातील थकूनी| जिव्हा होईल पुष्पनी||१८||

माझ्या जन्मभूमीचे नाम भारत| जेत घडले
रामायण महाभारत| जेत ज्ञातू गीता वेदांत | जेत
व्यासू वाल्मिकी कालिदास कवी जात|
घोषाला विश्ववरा ब्रम्हवादिनी तपस्वीनींचा
देशु||१९||

येथे सप्तर्षी ऋषींत महान| चार देह भारतात
जाण|चार वाणी – खाणी हे ज्ञान| भारतास
जाहले||२०||

दौष्यंती शाकुंतल नामु तयाचे भरत|
चंद्रकुरुवंशात जात| सेवाव्रती विनयशीलू
स्त्रीशिक्षणाविषयी जागृत्| तया नामे भारत
जाहले||२१||

“भारत” पूर्व नामु आर्यदेश|तत्पूर्वे संस्कृत देश|
संस्कृतीचा पाया हा खास| भारत
जाणावा||२२||

भारम, तोल्लयति इति भारत| वैदिकाभ्य:
लोकभ्य: व्यापृता इति आर्य देश||

संस्कृत्या: मूलेति संस्कृत|प्रवित्राणाम स्थानेति हिंदुस्तान||

भारतात अनेक ऋषी विद्वान| अनेक तपस्वीनी ब्रम्हवादिनी महान| अनेक बुध्दीमान जाण| कलासाहित्यविज्ञानाचा पाया हाच|| 23||

महान वीरू| अनेक शुरू| अनेक हुशारू| माझ्या भारतात||२४||

मातेनंतर मातृभूमीचा मान| भेदभाव् करी न|
जित आपुले जनन ते  मरण| मातेबरोबरी करी
संभाळ||२५||

जया घातला पाया सुसंस्कृतीचा| तया मूळ
वैदिकतेचा| तया आधार ' एक सत्
‘ चा|अर्थात परमार्थाचा| जाणावा||२६||

संस्कृती आध्यात्मिकतेची| परमेश्वरसाधनेची|
समाजोत्तमेची| उत्तम दोहोंची| प्रपंच
परमार्थबोंधिकाही जाणावी||२७||

सर्वांआधी ही व्याली| सत्संस्कृती आर्य
संस्कृतीत  पाल्हाळली| आर्यसंस्कृती वैदिक
संस्कृतीत रुपाली| भरताभिधानें जाली|भारतीय
संस्कृती||२८||

सर्वांआधी मनु शतरूपे सत्संस्कृती
विस्तारिली| एक सत् आधारिली|पुढे पुढे
वंशानु वंशे पाठविली|आध्यात्मबोधिका||२९||

अशी भारतीय संस्कृती महान| तिला वेद-
गीतेचा आधारू जाण| तिला सर्वांत आधी
मान| राखावा||३०||

विना वेदम् विना गीतां विना रामायनी कथा|
विना कवी व्यासम् विना सताधारम् कीदृशी
भारतीयता ? ॥ वेदांत||

साऱ्यांहूनि माझी जन्मभूमि महान|
तीच माझी कर्मभूमि जाण|
तीच माझे मृत्यभूमि जाण|
जन्मभूमे जया जनन ते मरण|
तिचे का करू नये स्तवन?||३१||

यस्याम् जन्ममृत्यौ पालनपोषण जीवना:|
सां कर्मभूमि न भवतु सौमित्र
किमर्थम ?||रामायण||

माता आदिशक्तिचे स्तवन| जिने केली सृष्टी निर्माण| जी कल्पना प्रेरणा जाणीव जाण| जी सांभाळते जीवन| तिला करू नमन|| ३२||

आदिशक्ति नमो नम:| प्रथमम् भगवती
माता शक्ति नमो नमः| कुंडलिनी माता शक्ती
नमो नमः||महाभारत||

तीच मूळमाया जाण| तीच प्रकृती महान| तीच पुरुष जाण|साऱ्याचे||३३||

निश्चळ परब्रम्हामधे चळण| ती स्वयं प्रेरणा जाण| तीच जगज्जोति माया अन्। वायु हीच प्रकृती जाण||३४||

वायुने प्रथम स्त्रीकार घेतला| म्हणूनी वायुपासूनि देह जाहला। आदिशक्तीचा||३५||

इने पंचमहाभूते निर्मिली| गुणमाया
जन्मली|त्रयगुणे
पाल्हाळली|ब्रम्हविष्णुमहेशांत||३६||

विष्णु तोचि पुरुष जगज्जोति । तीच प्रकृती ।
तेथेचि जाणीवेची गति| आधी  उतरली||३७||

जगज्जोति म्हणजे जाणीवेच्या कळा| तेथेचि
बुध्दीचा जिव्हाळा|गुणमायेच्या  प्रसूतकळा|
पहिली पुत्री शारदा||३८||

पंचमुखी ती सरस्वती जाण| दशमुखी लक्ष्मी जाण| अष्टमुखी पार्वती जाण| आदिशक्ती गर्भावस्थे उतरली तया||३९||

शारदा गुणप्रकृती| रजोगुणाचे प्रतिकृती| वेदांची आकृती| आहेचि||४०||

शारदा मोक्षलक्ष्मी| धनलक्ष्मी| महालक्ष्मी| धान्यलक्ष्मी|रुद्रलक्ष्मी |तुळजाभवानी अलक्ष्मी| आदि रूपे जाहली||४१||

शारदापासून महासरस्वती| वेदाकृती भगवती गुणवती| ज्ञानवती धीमती | श्रीमती विद्यावती बुध्दि मती| शक्तीमती मतीमती वृध्दीवंती| जाहल्या||४२||

शारदा पासून रेणुका पार्वती|काली कृत्या विवरी स्वाहा भद्रा भवानी भांति। मातंगी विपश्यनी कमला मृदानी चिन्मयी परमशक्ती| आधिशक्ती नग्नेश्वरी वाग्विलासनी दुर्गावती| ऋति कल्याणी हुंकारनादिनी भयंकरा शांती महाभयंकरा||४३||

वनवासिनी  राजेश्वरी परमेश्वरी मोहिनी
नीलग्रीवा चंद्रकला वर्णिनी|दीर्घा शुध्दा क्षुधा
लक्षणा पूर्णा महापरा सुषृम्नी| कृष्णकुंडली
कालवनीता स्वप्नाली शैला सावित्री
भयानका|कल्पना शूलधारिनी चक्र पाणिनी
तीराक्षिनी रूधिरचामिनी| भोगिनी नग्न
नृत्यांगना अपराधचौरिणी
क्लेशहारिणी|वीरांगना सकलोध्दारिणी
ललितप्राणहारिणी भालचंद्रिनी| संजीवनी
गर्वमर्दिनी विद्यादायिनी विधानाशिनी
सुंदरडाकिनी रोहिणी शिवत्रिशुलछत्रिनी
प्रतिभाशालनी चन्डघातीनी  ब्रम्हकन्या
चांडालिणी सिध्दिदायिनी  शिवप्रिया

भूतप्रेतनिवासिनी । महारुद्रा मुखज्वाला

कृष्णवर्णाविलासिनी  विच्चवाच्यविलासिनी

शाकंभरी ऐंकारी सृष्टीबीजा      मधुमर्दिनी|

रुद्रा असूरनाशिनी नग्नललिता निद्राप्रिया

यशोदा कालिका रुपदा कुंडलिनी|

विंध्यललिता वाणी मंत्रविलासनी तत्त्वरूपिनी

भूतरूपिणी|

त्रिपुरभैरवी चामुंडा निर्गुणा विधात्री कालिनी ।

भूचरी खेचरी पराचांडालिनी अगोचरी भैरवी

दिगंबरी छिन्नमस्ता मध्यमा पराडाकिनी

नादिनी| मद्यप्रिया विपदी आपदी

संकटनाशिनी| चंद्रभैरवी महातारा,

ऋषिवरदायिनी सुखदायिनी|पांचाली सोम तारा
कामसुंदरी योगदेवी कामदेवी ललितकालिका
घोर तारा प्रेरणादायिनी| ज्ञानजयिता दुर्गा
महादुर्गा जानकी  उग्रगौरी गोपिनी|
महाबगलामूखी ललियवल्लभा  वामदुर्गा सती
श्रेष्ठ प्रतिभा दिव्या पूर्णाबरीनी| भुवनेश्वरी धात्री
दात्री  हत्री कत्री सगुणी। स्मशानवासिनी
रक्ताकिरता कृष्णवर्णिता आदितत्वा
गुहयवासिनी मूलिनी| आदि चौऱ्यांऐंशी लक्ष
योगिन्या कालशक्ती शारदेपासून
जाहल्या||४४||

वन्दे सरस्वतीम् देवीम्
वीणापुस्तकधारिणीम|पद्मासनां शुभ्रवस्त्रां
कलाविद्याप्रदायिनीम्||उपनिषद||

जैसे कोणतीही सरिता मिळते सागरासि|
आदिशक्तीकडे साऱ्या देवांची उपासना
पोचसि||४५||

आकाशात पतितं तोयं यथा गच्छति सागरम्|
सर्वदेवनमस्कार : केशवं प्रति गच्छति ॥
वेदांत||

तैसे कोण्याही देवांची पूजा करावी| पण
आद्येकतत्वाकडे पोहचावी|आदिशाक्त्ये सारे
व्यवस्थावी| सत्येक म्हणतात तेच खरे||४६||

शारदा व्याली| तीतून चौऱ्यांऐंशी योगिनी
आली। शतरूपे जाहली||४७||

गुणपुरुषप्रकृतिची दुहिता| योगिनींची माता|
मयूरवहिता पुरूषनम्रा| जाणिजे शारदा||४८||

शारदाम स्वपृष्ठे वहसि त्वम् या ज्ञानधनं
यच्छति विपुलम्|| मयूरनृत्यम् रमणीयम्||

शारदा ज्ञान देते| धर्म देते| काम, मोक्ष देते ।
सर्वदात्री||४९||

शारदा ही शतरुपेची जननी जाण| गुणप्रकृति
महान वेदांची खाण|अगोदरी वेद एक
जाण|व्यासे केले तयाचे विभाजन| चारी
भागें||५०||

ऋग्वेद सामवेद यजुर्वेद अथर्ववेद तो चवथा|
आर्षवेद भांडारचि आहे सूक्त- मंडले-ऋचांचा|
तयांच्याच गायनाचे मार्गदर्शन सामवेदे

म्हणावा|तंत्र-मत्र, गृहस्थीची नीतितत्वे आहेत
अर्थववेदात||५१||

धन्ये ते वैदिक तत्त्वज्ञान| विकसित जाहले
शारदेच्च्या मुखें जाण|अपौरुष्ये निर्मिले गेले ऐसे
ज्ञान प्राचीन|शत शत वारें मम त्या
प्रणाम||५२||

प्रिया जणु वेदांची अर्धांगिनी| संहिता स्तुति
करिते देवतांची कवनी|सर्वप्रथम निसर्गाची-
प्रकृतीची आराधना करुनी| ‘नांदीच’ म्हणावी
संहिता वेदांची||५३||

यज्ञविधीचे फल हेतू करितात
स्पष्टीकरण|‘वेदांचे भ्रातृ’ जयांसी
संबोधन|पौरोहित्याचे संपूर्ण ज्ञान| आहे
ब्राह्मणकांत जाण||५४||

आरण्यांकासी ‘ज्येष्ठ’ म्हणावे| अथवा शालक
ते बरवे| संहितेच्या जोडीने बैसोनि तत्त्वज्ञान
आळवे|प्रयोजन प्रत्येक यज्ञाचे सांगती||५५||

पुत्र ते वेदांचे किंवा ‘वेदांत’ म्हणावयाचे|
पित्याहून अधिक श्रेष्ठ ज्ञान पुत्राचे| प्रत्येक
उपनिषदांत प्रगटिले||५६||

आत्मा, विश्व, ब्रह्म,ईश्वर आदि संकल्पना| त्या
उपनिषदांतूनिच पावल्या चळणा| निवारती
शंकित मना| सर्वथा||५७||

कठोपनिषद, यमोपनिषद, तैतरिय, आदि
अनेक विभागण| विभिन्न भांगे जाहले उत्पन्न|
जाहले

तयांतूनी ज्ञान निर्माण|नचिकेताचे-ऋषीचे-अन्यांचे||५८||

ऐसे बान्धव वेदांचे| शालक, कांता,भ्रातृ नि पुत्र तयांचे| सर्वोत्कृष्ट तत्त्वज्ञान जयांचे| तयांसीही मम नमन||५९||

त्यातील एक सत् जाण| सर्व देवतांत महान| किंबहुना त्यांत सामावितात सर्व देवगण| ऐसे ते परब्रम्ह||६०||

एक सत् एकचि स्थान| यदि केले कोण्या न
कोण्या देवतेचे आराधन| अथवा कोणत्याही
केले सूक्ताचे पारायण| तरीही अर्पित होते एका
सत् कडे||६१||

संक्षेपात म्हणावे तर प्रत्येक भक्ति करण्याचे
साधन|अथवा कर्मकांड, ध्यान| ज्ञान ग्रहण-
प्रदान| हे सर्व काही जुळलेले आहेत
'एकसतशी '||६२||

‘एक सत्' एकतत्व जाण|साऱ्या देवांत  महान|
आदिशक्ती महाशक्ती आदि पुरुष विद्यमान|
नियंत्रण करितात सर्व देवांवरी||६३||

ऋताचे नियमन| निसर्ग शक्तीचे संचालन|
कर्मचक्राचे व्यवस्थापन| करे स्वयं एक
सत्||६४|

एक सत एक तत्त्व| साऱ्या देवतांचे सत्त्व|
ऋताचे महत्त्व| तयातचि सामाविलें||६५||

ओम केंद्र जयाचे| वलये आहे भवती तेजाचे|
स्वरुप तेचि परमात्म्याचे| तयासी मम प्रणाम
जाणावा||६६||

इति श्री शक्तिवचने सर्वनमन| पूर्ण जाले
जाण|
पुढे उत्तम प्रपंचाचे लक्षण| येईल||

## उत्तम प्रपंचाचे लक्षण

पवित्र होईल देह| होईल अवस्थातीत विदेह|जो
परमार्थ करी प्रपंचासह| तोचि||१||

उत्तम प्रपंच| भक्तीपरमार्थाचे लक्षण
हेच|जाणीव, बुद्धी, गति कुलीनता उत्तम
प्रपंचाचे गुण हेच| वागील तोच। करी उत्तम
प्रपंच| शक्ती स्फुरित||२||

उत्तम प्रपंचाचे  मुख्य लक्षण| निरूपण ऐकोन|
अथवा अभ्यास करून| निवड करणे
सारासर||३||

म्हणजेच सांगते विस्तृत आता|  असार
उमजुनि टाकोनि स्वीकारणे सारसरिता|
नाहीतर प्रपंचात खोटा| म्हणा||४||

असत्य वाचा करु नये । कुसंगति धरू नये|
अळीप्रमाणे चिखलात् भिज् नये| असा
असावा प्रापंचिक||५||

श्वानापरि प्रामाणिकता| हर्यक्षापरि (सिंह)धैर्य
शीलता| भूपरी क्षमाशीलता| अंगी
बाणवावी||६||

दुसऱ्याचे कधी घेवो नये| घेतल्यास उरवो नये|
दारिद्र्यात स्वाभिमान सोडो नये|
परब्रम्हविश्वासापोटी||७||

प्रपंच पेलोवोन| देवाची भक्ती करोन| जन्म
सार्थकी लावून| आसक्तांमधे अनासक्त||६||

जसे कमळ पत्र अथवा| पंकज चिखलात
असोनी अलिप्त वा| जसे परब्रम्ह देहांत असोनि
अलिप्त| तैसे दुष्टांत पवित्र||९||

असेच उत्तम  प्रापंचिकाचे  लक्षण|करी धर्म
न्यायनीतीचे रक्षण| न करी  परकीयवस्तुचे
कामन| सर्वथा ||१०||

अजून लक्षणे काही |सांगावी पुढेही|उत्तम
प्रापंचिक बनू आम्ही| करावी पूर्ण सात्त्विक
कामना||११||

सामान्यांची आशा उजळली|पृच्छिताच शक्ती वदली| प्रापंचिक निरुपणे केली| सात्त्विक सरळरित्या||१२||

उत्तम चातुर्य ज्याच्या ठाई| तेथे वासना  काई| विकारांसोबत न येई। ऐसा पवित्र प्रापंचिक असावा|| १३||

मनापासून करणीय करी|उत्तम अनुसरी| मोक्षाहूनि देव इच्छी|ह्याला म्हणावा कृष्णापरी प्रापंचिक||१४||

अतिथीचा आदरसत्कार|मुलांवरी उत्तम संस्कार| कर्तृत्व तरी अकर्ता असा निरंकार| बरवाच म्हणावा||१५||

जो करी अतिथीचा अपमान|अथवा जयाचे गृहे कृपे बैसिले तयाचा तत्भक्ताचा अतिथी करी अपमान| हे निव्वळ मुर्खेतेचे लक्षण| जाणते तुम्ही||१६||

विविध शक्त्यांत करी तत्वत: विभाजन| सर्व कार्ये  अनुमान| स्त्री-पुरुष, मानव-चांडाळ,

श्वान-गज न माने समान| तयांत मी नांदे ही न जाण|  तो मुर्ख प्रापांचिक||१७||

राजसूये मज जागी कृष्ण दिसले|कृष्णजागी मी अवतरिले| हे देखोनी स्वप्नावाणी इसरले| कौंतेय||१८||

तैसे तुम्ही करू नका| पारमार्थिक अनुभव विसरू नका| तत्व एकीच हे झिडकारू नका| तुम्ही ना शहाणे||१९||

द्युतमदिरा परा संगम चौर्यता मृगया |दूर राही व्यसनापासून या| शांती लखलाभ तया| हा ही उत्तम प्रापांचिक ||२०||

असोनि मागे तया न करे उपकार| पुण्याईचा साठा करी अपार| जन्ममृत्यू पार| करण्याकरिता||२१||

कष्ट दुःख देऊनी स्वत:हुनी देह मन दुणविणे| त्यापरी भक्तीमय निष्काम कर्मात लावणे| व्रतोपासना नाहीतर कर्मकांड नित्य करणे| हाच प्रपंचाला द्यावा परमार्थाचा आधार|| २२||

देवाघरी अथवा विश्वासूवरी तरी ठेवणे विश्वास|
संकटे आल्यास| ती झेलण्यास व दुसऱ्या धीर
देण्यास| मदत करी|| २३||

दारा -द्रव्य पुत्र वरी गाजवणे अधिकार|
परमार्थास माने मुर्खाचार| हरेक धर्मकार्यास
नकार| तो प्रपंचात काय उपयोगाचा||२४||

धर्मयज्ञ ज्ञानकार्यात नेहमी पुढाकार| सगुण
भक्तीत साकार| व्यवहारांत मकार| हाच उत्तम
प्रापंचिक||२५||

परदारा – बांधवांसी न आर्थिक- राजकीय व्यवार|करी सज्जनांचा कैवार| करी मानवतेचा उध्दार| सर्वात  सुजन||२६||

नम्रता परी लाचारपणा नाही| उद्धता नव्हे परी भवत्मत मांडता लज्जा नाही| क्षमाशीलता परी अधर्मासि  सूतणे नाही| हेचि कर्तव्य प्रापंचिकाचे||२७||

अडले नसता शंका विचारणे| टवाळी उगी
करणे| अथवा अडले असता विचारया
लाजणे! हा मुर्खपणा करोचि नये|| २८||

जो साऱ्यांत ब्रम्ह हे ज्ञान मुरवे|विचारांवर
नियंत्री बरवे| भौतिकवाद अर्थार्जनार्थ
साम्येहिक वाद मातीमोल करवे| म्हणावे त्यास
उत्तम प्रापंचिक||२९||

अथवा उत्तम प्रापंचिक होण्यास मार्ग एक
अजून| पंचकन्यांची चरित्रे वाचून| अथवा

देवीभागवत अथवा कर्मयोगाचा अर्थ उमजून|
संसार कसा करावा हे तरी जाणावे ||३०||

संकटे -दुःखे आल्यास| नानाविध कष्टे-ताप
झाल्यास| धीर -संयम- निष्ठा खचल्यास|भक्त
कैसा म्हणावा||३१||

पांडित्य परी  बडबड नाही| साधना परी थोतांड
नाही । धैर्य परी दांडगाई नाही| हे उत्तम
प्रापाचिंकाचे आचरण||३२||

सुःखदुःख वाटेल समान| नि
मानापमान|आशापण
नैराश्यपण|सहनशक्त्ये||३ ३||

मुर्खांत जाऊन बैसणे| त्यापरी पंडितसंगे राहणे|
आपुले चारित्र्य मर्यादा राखणे| परिणामी
सामाजिक प्रतिष्ठा होई दासी||३४||

दिवस पालटतात काळ जाई|कधी मिरी कधी
राई| कधी सुःख कधी दुःख हे जया ठाई| तोचि
निश्चित प्रापांचिक||३५||

प्रकृतीचा आपणु लेकुरवाळा| न भ्यये अत:
कळीकाळा| पहुडावे  निश्चित  तया उरो
निश्चळा|  हे भान सकळा| तोचि निश्चित
प्रापंचिक||३६||

चोवीस यामे चिंतन जमत नाही| म्हणोनि ऐसे
रूदित नाही| तर्हि  ईश्वर स्मरण हा कार्ये राही|
हाही उत्तम प्रापंचिक||३७||

दारा अथवा भर्ता द्रव्यासी मिळुन-जुळून वागी|
आहे त्या परिस्थितीत समाधान  हे जयांगी|

त्यासी सुख-वैभव करे सलगी । परी तो
नलगी| महापुरुषच होय||३८||

प्रपंच टाकोनि न व्हावे व्राजक| संन्यास
टाळण्याया न व्हावे प्रापंचिक|
गुरुच्छेविना||३९||

परंतु तुम्ही ईश्वरस्मरण अथवा नियमित साधन
करिजे बोलिजे| रजस्वले का न रजावस्थे
ईश्वरभक्ती करिजे? अन् सकळ चिंता पाठी
निश्चित कैसे रहावे|| ४०||

सावधचित्ताने एका| नाहक विकल्प करू नका|
गोंधळात पडू नका| शास्त्रविषये||४१||

देव्ये सूचना केली| सगळीं निश्चिंत ताठ बैसली|
प्रापंचिक लक्षणे ऐकिली| विकल्प
सोडुनी||४२||

रज न अपवित्र| तर्हिं लोकापवादाचा विषय|
म्हणुनी पिढीं नु पिढ़ीं सूत्र| हेचि पुढे
चालिजे||४३||

जन्मतः कन्यांगे चत्वारशत लक्ष अंडपेशी
जाण| सारे जाणती हे विज्ञान| किंतु रजोमंचक
बाळाकरिता निर्माण| हातभर अंडपेशी
उत्सर्जनाचा||४४||

पण रज अपवित्र मानोन| प्रयत्ने नष्ट ठरवोन|
चत्वारशत लक्ष येईन| काढता अंडपेशी या
जन्मे||४५||

किंतु अपवित्र लोकोपवादाचे| म्हणून
मानसिकत्व भ्रमाचे| पर रजस्व:ला नाही|ती

माता होणार नाही| जीवनात सुख नांदणार
नाहीं|  वृध्दापणी त्रास||४६||

रजोत्सर्जनाच्या मार्गिका आटोन| अंडपेशी
सडोन|ते जाती गर्भाशयात साठोन| पोटात
नाना विकार| जीवनभर उद्भवोन| रजस्वला का
होते हे जाणा||४७||

बोजे शिरावरी रूढी परंपरांचे| यापलीकडे
गेल्यावाचून ईश्वरप्राप्ती नाहीचे| हे तुम्ही
जाणावे|| ४८||

आणि दुसरे कारण| सतत होणाऱ्या
रजोत्सर्जनाचे चिंतन| तेथे कैसे होईल
ईश्वरस्मरण|सारी चिंता ईश्वरावरी सोपविल्यास
काम होईल||४९||

रजावस्थे का करू नये ईश्वरास्मरण|
तयावस्थेही चाले ईश्वरकृपेचि पचन -उत्सर्जन|
हृदयाचे आकुंचन प्रसरण मिश्र रक्तप्रसरण| सारे
ईश्वरकृपेने एवढे जरी मानने तरी ईश्वरस्मरण
जाले|५०||

तरी विकल्प आला| लगेच  शक्तिस
सांगितला| ‘सारेईश्वरकपेने’ मानताच ईश्वर
स्मरला|कैसे काय||५१||

बघा चमत्कार आशंकेचे |एक फिटली तर
दुसरी आली स्थानात मनाचे| याकरिता आधार
शास्त्राचे| का हवेत||५२||

सारे ईश्वरकृपेने मानताच| गेले सारे कर्तृत्वच|
विरलं वारं अहंकाराचं| म्हणोनी उत्तम
प्रापंचिकाची नम्रता बाणली||५३||

चिंता कशी घालवावी । तर ईश्वर भलेच करीले
अशी भावना ठेवावी |मग बरवे करिले या
विश्वासे चिंता काय राहावी| निश्चित प्रापंचिक
साधक||५४||

मनात तिरस्कार | मनोभावे केला सेवोपकार|
मी सेवा  केली म्हणणार| कर्तृत्व घेता तपाचा
काय उपयोग|| ५५||

कारण नसता दोषी ठरविणे| त्यापरी
बिरबलापरी दोष  दाखवूनि चांगले मार्गी

लावणे| दोष सुधारवून  घेणे| हेचि उत्तमाजे
लक्षण||५६||

आपुण बरवे । अन्यास बरवे करावे| बौले तैसा
चाले ऐसे वर्तावे| धन्य  ती व्यक्ति|| ५७||

पुण्याची वाच्यता करु नये| मनास मळ लावू
नये|  वर्मावर मर्मावर बोट ठेवू नये| दुणवावे न
कुणाचे मना||५८||

ऐसे उत्तम प्रपंचाचे लक्षण| घ्यावे अंगी बाणून|चित्त भक्तीत आणून|व्हाल सायुज्य||५९||

कारण नसता भरमसाठ निंदा करणे| कारण नसता स्तुती करणे| कारण नसता तोंड घालणे| उभयंतात||६०||

ही लक्षणे मुर्खाची| नसावी प्रापंचिकाची | पापकर्मे करावयाची| हा उद्देश मुर्खांचा||६१||

कारण नसता चिडणे| कारण नसता रुदणे|
कारण नसता भांडणे| मर्यादा सोडणे|
कोठेही||६२||

विद्वांनात बुध्दि पाजळणे| अकरणीय करोनि
इभ्रत घालवणे| नको ते धोके पत्करणे ।
दुसऱ्यांचा विचार न करिता||६३||

जादा वा खराब वस्तुंचा उगीच संचय| मनी
वासनेचे विषय| साधने विकल्प -संकल्प|
ध्याने कल्प| करोचि नये||६४||

चोरी करो नये |जादा शोभा करू नये| मळीन
राहो नये । साधे राहणीमान ||६५||

सदा प्रसन्न मुख| गांभीर्याचे मनी  सुख|सतत
आपुले दुःख| दुसऱ्या सांगो नये||६६||

नाहक चिंता का करणे । उगी भिती का
बाळगणे| स्वतःस का दोष लावणे| स्वयं
परब्रम्ह असता||६७||

सुवर्ण -सामान्य  अलंकारासी माने समान| धन तृणासमान जाण|  देवभक्तीसाठी करी जिवाचे रान|हाही उत्तम प्रापंचिक||६८||

देऊनी  गोग्रास|अथवा गोप्रसाद मानस| जेवू देऊनी अतिथीस| शिवाय न ग्रहे स्वयम्||६९||

वडिललोकांच्या निर्णयास देणे मान| न करने लोकांचा अपमान| स्वीकारणे हसत नियतीचे पान| हेही उत्तमाजे लक्षण||७०||

परमार्थप्रपंच दोहोंची सांगड| तुले प्रमाण
दोहोकडे  समान तंगड| ठेवावे||७१||

देवाचे भक्तीचे प्रदर्शन| पुण्याचे वाच्यन|
पापबुध्दीचे कथन । करोचि नये||७२||

दक्षिणी आसामी  समान परमार्थ जाणावा|
यातील दास्य वा भक्त आपण मानावा|
प्रवासीहून अधिक आनंद लुटावा|न पैसे
भरोन|| ७३||

झटकावाणी परमार्थ करावा| संकटी फक्त देव स्मरावा| नाहीतर विषय चिंतनात रमावा| हे येथे खपणार नाही||७४||

मनी आनंदाचे सागर। वरोनि कर्माचे सागर (आवरण)) आत्मी नामाचा जागर| हे बरवे||७५||

वेष असावा बावळा। अंतरी परमानंदांच्या कळा| ध्यानात  कार्यात असावा बगळा| हाही उत्तम प्रापंचिक||७६||

करोनि प्रचीती| थोरांस वंदिती|बाह्यांगे नांदती|
अंतरांगे ईश्वरती| अशी महत्त्प्रकृती
|मानावी||७७||

तुम्ही म्हणती| प्रापंचिक उत्तम हरकामे एकाग्र
असती| परी मने ईश्वररती | कैसे
असावे ?||७८||

मने ईश्वरती| कार्ये एकाग्रती| हवी यशस्वीति|
कैसे ठेवता येईल ?||७९||

जने प्रश्ने पृच्छिली| ऐकोनि शक्ति हसली|
शांतपणे सांगितली| परमार्थाची
गुरुकिल्ली||८०||

मन ईश्वरे लागती| अथवा  शाश्वतनंदात रमती|
दोहों एक असती| ईश्वरचिंतनाचे मार्ग|| ८१||

मन परमेश्वरे लागती| एकाग्रता स्वयं कार्ये येती|
दैव्ये कार्य करती| इंदियामधे  उतरोन||८२||

ऐसे कैसे काय| देवास पालनाचे ,क्षुधा
शमनाचे, तृष्णाशमनाचे, वर्षेचे आदी कामे

अजून काय काय| तर त्यो कैसे इंद्रियामधे
उतरती वो माय|आम्हां गुप्त निरुपावे||८३||

अन् हे आसक्तीचे मूळ| कैसा काढावा
वासनेचा मळ| हिचा खोदूनही तळ| मिळेल की
नाय||८४||

पुन्हा शंका आली|  पूर्ण प्रचीती नाही आली|
नसावी आत्मज्ञानाची सामान्या||८५||

सांगोन पुन्हा विचारले|ऐसे का तुमी विसरले|
देव रोमेरोमे ही प्रचीती वाटते न आली|
तुम्हांस||८६||

देवाची स्वरूपे नानाविष्ट| चित्तेही सन्निध|
मूलाधार ते ब्रम्हरंध| साऱ्या चक्रांत नांदे
चक्रपाणी||८७||

आत्मा सत्रावी प्रकृती| आदिशक्ति परत्मामांश
जगज्जोति| आपल्यातच नांदती| परी शोधूनी
न भेटती| परिश्रमेविण||८८||

आत्मा म्हणजे  मुळातच चैतन्य शाश्वत| नित्य
पुरातन अनंत| न त्यास विकार न खंत| त्यास
जाणती संत| तोच ईश्वरांश मानावा||८९||

हे थोडे नंतर विवेचन विस्तुत| विषय न
ढकलला जावा प्रस्तुत| हेच आताचे उद्दिष्ट|
आता संक्षेपात| सत्रावी जाणू||९०||

सत्रावी सोळा पाकळयांवरती| ब्रम्हरंधी नांदती|
सतरावा  पुरुष  व मुख्य प्रकृती| यांची मिसळ
असती| हाती तारा रुपी अमतकलश
धरोनी||९१||

सिद्ध कैसे जगतात हवेवर |तर सत्रावीच्या
अमृतरसावर| हे ध्यानावस्थे असता ही
भरणपोषण करणार|होऊनी तारा रुपी उलटी
गंगा||९२||

भरणपोषणात हिचे योगदान| म्हणून जाणावे
हिस महाकारण| आत्मा नुसता कारण|
हिच्याहूनी अध स्तर||९३||

प्रकृती अर्थात स्वभाव| तिचा अंतरांत ठाव |
अनाहतात निभाव | साऱ्यांत एकचि जाणीव|

साऱ्यांत नांदे प्रकृतीचा भाव| म्हणुनी समर्थे
सांगतो साऱ्यांचे अंतकरण एक||९४||

आदिशक्ति अर्थात मूळमाया|
त्रिगुणपंचमहाभूते हिची छाया| देवांत हिची
तेजाया| तैसे बीजरूप सृष्टीत हिचीच काया|
विस्तारली||९५||

परमात्मांश म्हणजे षोडसरक्तपित्री| परमात्मा
अन आत्मा एक नव्हे हे सूत्री| परमात्मा म्हणजे
परब्रम्ह हे नव्हे जाणे सार ती कुत्री|
मानावी||९६||

हा षोडशरक्तपित्री  सत्रावीच्या उभयांगाला|
वसती ब्रम्हरंधाला| लाजवेल तेज हयेचे
तेजसाला| रक्तपित वर्णेरूपे||९७||

हा आत्मासमान निरंतर| परब्रम्हापरी निरंजन|
सिद्धपक्षी घालती गुंजन|याभोवती||९८||

जाणीव, वासना कल्पना| मेधा, स्मृति
संवेदना|रुची प्रीति भक्ति कृति धृती संकल्पना|
श्रुति मति शुचि जाति यंत्रणा| आपुल्यांत
नांदती||९९||

जाणीवेतून वासना जाहली| तितून वरील सारी रुपे निर्मिली|सत्वगुणे पाल्हाळली| विष्णुतत्त्वे अनाहतेही||१००||

ही जगज्जोति| हीच प्रकृति| आपुल्यांत वास करती| ही जाता देह पडती| आत्माही नियंत्रणाखाली||१०१||

हे सारे जाणणारा | मनी ब्रम्हज्ञान मुरविणारा| सदा ईश्वरचिंतने  गढणारा|पर कर्मी असणारा| उत्तम प्रापंचिक||१०२||

देहाचा आदर करणारा |साऱ्यांत ' तो'
पाहणारा| तत्त्व एकचि मानणारा|ब्रम्ह ज्ञान
ऐकणारा| जाणीवेची जाण ठेवणारा|सारे
ईश्वरच्छेने मानणारा| लक्षणे ऐकोनि
वागणारा|आंगी मुरविणारा| महापुरूषच
जाणावा|मग तयासी सिद्धी लक्ष्मी मोक्ष करे
सलगी|परी तो नलगी| हा उत्तम
प्रापंचिक||१०३||

लक्षणे ऐकोनि  समोरावरी सोडणारा| तेच तेच
अजाणे करणारा|न स्वतस बदलविणारा | कर्ता

स्वयम्  मानणारा| उपदेश झिडकारणारा|
मानावा करंटा| त्यास म्हणावे| साऱ्यांत खोटा|
परमार्थात तोटा|तेथेचि||१०४||

अशा बाष्फळाच्या नादी लागो नये| अन् स्वत:
मूर्ख होवो नये| सगुण भक्तिस विसरों नये ।
सामर्थ्यास दुरोपभोगो नये| सर्वथा||१०५||

शक्तिवचने नेहमी सत्य| जो म्हणेल
असत्य|त्याचे जाणावे थोतांड|तो जाला उदंड|
जाणावा||१०६||

सत्याचे वचन| पाळोनि करील इंद्रियदमन|
त्याचे मंदिर म्हणजेच तयाचे सदन|योगी
मानावा||१०७||

इति श्री शक्ति वचने उत्तम प्रापंचलक्षणे पूर्ण
जाले जाण|पण पुढे विवेचन| अजून
येईल||१०८||

# ज्ञात्याचे लक्षण

पूर्वी वर्तिले प्रापंचिक लक्षण | आता सांगते ज्ञात्याचे लक्षण| हे लक्षण अति दुर्लभ| हे जाणावे||१||

परंतु प्रापंचाचे ज्ञान| माहितीय ध्यान| जाणिजे अथवा कर्मकांडाचे पालन| वा ईश्वरपूजन| म्हणजे ज्ञाता जाला का ?||२||

मनावर नियंत्रण | इंद्रियांवर दमन| असाराचे वमन| असे करी तो ज्ञाता का||३||

दिल्या अनेक परीक्षा| संतांची घेतली
दीक्षा|इच्छितो मोक्षा| असा हा ज्ञाता का||४||

घेतले डिगेरेचे उच्ची शिक्षण| नाहीतर
परदेशात भ्रमण |नाहीतर धन्वंतरीचे वैद्यकीय
जाणतेपण| नकुलसहदेवांगत||५||

अथवा  रत्नपारखेपण| अंतर्मनांची
जाण|दंतलोमन्नखांचे कृत्रिम रोपण| ऐसे जाणे
विज्ञान| तो ज्ञाता का||६||

शस्त्रक्रियांचे ज्ञान |सतत मौन| प्रसाधनांचे
निर्मिण|अजून काही||७||

प्राण्यांचे परीक्षण| भूत उतरविण्याचे लक्षण|
मंत्रांचे शिक्षण| ज्ञाता का असा||८||

मृत्यूवरी विजय| इच्छामरणाचे वरदानाय|
अमृत पिताय। ज्ञाता का तो||९||

अथवा धनंजय| अथवा कालंजय| अथवा
रुज्जंय| तो ज्ञाता का|| १०||

चित्रकला शिल्पकला शिवनकला|
मुत्तिकाकला अभिनयकला शृंगारकला|
नृत्यकला संगीतकला आदी चौसष्ट कला| तो
का ज्ञाता ज्यास ठावे हे||११||

अंगारा मंतरता येते ! दृष्टीने बोलता येते| दूरोन
अंतःकरण जाणता येते | असा हाय का
ज्ञाता||१२||

सारे खाद्यपदार्थ माहिते| अथवा अर्थव्यवस्था
सांभाळता येते|शास्त्रेही माहिते। वादांमधेही
पुढे||१३||

प्रतिभा बुध्दी ज्यास| ज्ञान झाले त्यास|म्हणावे का||१४||

अनेक पुस्तके लिणे|अनेक पारायणे करणे |तीर्थेनेके फिरणे| व्रते करणे| हे ज्ञाताचे का लक्षण||१५||

जलतरण |अथवा कृत्रिम तडितनिर्मिण| अथवा श्रव्यातीता-श्राव्य  ध्वनी  होई श्रवण| योगभ्यासाचे मनन – स्मरण| आदीचे ज्ञान|म्हणजे ज्ञाता का||१६||

वने राहिणे| हवेवर जगिणे|डोळे मिटोन बैसणे|हे
ज्ञात्याचे का लक्षण||७||

हरिभजन गाणे| धर्मप्रसार करणे|ज्ञान जागृती
करणे| हे का ज्ञाताचे लक्षण||१९||

जने  लक्षणे विचारली । ऐकोन शक्ति वदली|
नाही नाही आदी ज्ञानगीता पाहिजे कळली|
ज्ञान म्हणजे काय ते ऐकावे||१९||

सौदर्यांचे ध्यान| बलाचे उद्भवन| हे नाहीतर
वरवर पाहिता हे ज्ञान| अशाश्वत भौतिक जाण|
ऐहिक पण हे न जाणे अजाण| पूर्ण मूढमति
||२०||

वदित सारी तुमी लक्षण| पुरी पुरी भौतिक
अशाश्वत जाण| हे नव्हे खरे ज्ञान| ज्ञान
कळल्यावाचून ज्ञात्याचे लक्षण| सांगणे
मुर्खपण||२१||

कधी पडला का तुम्हांस प्रश्न|पृथ्व्ये जात
आपण बरे कोण| जम्णिचा  आपुला उद्देश

काय अन् जयाने आपण जिवंत  ते कोण|
निर्गुण प्राप्ती करिता अथवा खऱ्या ज्ञानाकरिता
पाहो नये अपुले रूप सगुण|  ते पाहता –
चिंतीता मति होई कुंठित|| २२||

कैसा पडेल तुम्हांस प्रश्न| उपाधीमागे तुम्ही
लागोन| देहबुद्धी होवान| खरे ज्ञान
विसरता||२३||

ही उपाधी म्हणजे कोण|जी आम्हांस अथवा
तेजास लोपवोन| करी खऱ्या ज्ञानाचे
विस्मरोण| हे खरे ज्ञान काय||२४||

आशंका धावत आली| शक्तें तिस
घालवली|प्रयत्ने पूर्वक||२५||

आता सांगिते खऱ्या ज्ञानाची गीता| हे
ज्ञानामृत पिता| जन्ममरणाचा फेरा चुकता|
जाला पाहिजे|| २६||

आता ऐका गीता अर्जुन होवोन | आशंकेचे
उत्तरे घ्या समाधान करोन| विकल्प जावो दे
सरोन| शांत चित्ते एका||२७||

ही उपाधी म्हणजे देहबुद्धीचे आरमार| मी देह
या जाणीवे उपाधीची धार| बलवान
होती||२८||

माया हे उपाधीचे रुप| अथवा  मायाच
उपाधीच ऐसे सांगिती खूप| पण होवोनि
सूप|ब्रम्हात्मज्ञान  स्वीकारावे||२९|

अस्तु न व्हावे विषयाचे परिवर्तन|आधी ज्ञान|
ते हजार अमृतांत श्रेष्ठ जाण| न त्यापायी ऱ्हाई
उपाशी विद्वजन| ते कोणते एक||३०||

हे खरे ज्ञान |म्हणजे स्वरुपाची जाण| अथवा
आपण कोण| हे माहिते||३१||

तुम्ही म्हणाल आपण  कोण| म्हणजे देह जाण|
चुकता आपण|  श्रुति चर्चिले तऱ्ही ||३२||

श्रुती म्हणती| तें विदेही लिखती|ईश्वरेच्छें
स्फुरती| म्हणूनी त्यास सत्य बोलिजे||३३||

शास्त्रे म्हणती| ते  विविध विषयांची मायती|
लोकोपवादाचे आचार असती | परी ते असत्य

असती| कारण अर्धवट आकलने चूके
होती||३४||

श्रुती म्हणती| देहातीत होणेकरीता साधो ब्रम्हा
विचारती| चिंतने होती| तयागत ||३५||

हेही खरे ज्ञान| ब्रम्हाची जाण| करितां त्यांचे
चिंतन| व्हावे त्याचे स्वरूपन|  पुरी पुरी सायुज्य
मुक्ती||३६||

हे सायुज्यमुक्ती  काय|  एक मुक्तीचा प्रकार हाय| मुक्तीचे अनेक प्रकार माय| आम्हां निरोपावे||३७||

ऐका ऐका| निशंकपणाने ऐका| खरे ज्ञानास परीक्षू नका| शास्त्रासही||३८||

संशय करू नका| परब्रम्हांविषयी उगा आशंका करु नका| ना दोष लावू नका| शांतचित्ताने श्रवणावे आणि ज्ञानास जाणावे||३९||

सायुज्यविषय  येता| लोक  प्रश्न  विचारता|
मज उत्तरता|आलेच पाहिजे||४०||

या मुक्ती चत्वार| चवथी अपार| असती निरंतर|
तीच  सायुज्य जाणावी||४१||

ऐकोन  न समोरोवरी सोडावे| ऐकोनी अकलेत
मुररावे| मानसात जिरवावे| सर्वथा||४२`||

प्रथमा ती सलोकता। दूसरी ती समीपता|
तिसरी ती सरूपता| चवथी महान
जाणावी||४३||

सायुज्य  नेहमी जाण| कधीही नष्ट | न ती
पुरातन| असी ती सनातन|मिळावया हवी||४४||

सायुज्य  ती निश्चळ| न होई चंचळ| नेहमी
अचळ|  सर्वथा  राहते ||४५||

सलोकता म्हणजे देवलोकात राहणे| समीपता
म्हणजे जवळ राहणे| सरूपता म्हणजे
तयासारखे दिसणे| पण सायुज्यता म्हणजे
ब्रम्हमयता||४६||

सायुज्यता ही अनंत। हीस जाणे संत| ही मिळविता न  विकार न खंत| सायुज्य होणे म्हणजे ब्रम्हात लीन|| ४७||

सायुज्यता म्हणजे ब्रह्मासारीखे होने|ब्रम्हात लीन होणे| देहाची जाणीव जाणे| म्हणजे देहांत विदेही||४८||

सायुज्यता म्हणजे सांगणे कठीण| ते शब्दातीत जाण| ब्रम्ह होवोन| अनोभोवावे||४९||

परब्रम्ह म्हणजे काय हे घ्या आधी जाणोन| हे ब्रम्ह जाणण्यास कठीण| परी विवेके तयाचे मनन करोन| स्वतः ब्रम्हस्वरूप व्हावे||५०||

परब्रम्ह म्हणजे परमात्मा| निरुपाधीक निरात्मा|अपार निर्विकार निरंतर अकर्तात्मा| विविध नामें गौराविला||५१||

निरुपाधीक म्हणजे उपाधी नाही| निरात्मा म्हणजे तयाचा निर्मित्रा नाहीं। निर्मळ म्हणजे मळ नाही|निश्चळ म्हणजे नव्हे चंचळ||५२||

अपार म्हणजे पार नाही| निराकार म्हणजे आकार नाही|निर्गुण म्हणजे गुण नाही| अकर्ता म्हणजे कर्तृत्व नाही| निरंतर म्हणजे अंतर नाही||५३||

निरंजन म्हणजे काळीमा नाही| निकळंक म्हणजे कळंक नाही|निर्दोष म्हणजे दोष नाही| निर्विकार म्हणजे अविकारी||५४||

अव्यय म्हणजे वाया जाणे  नाही| अक्षय म्हणजे नासणे नाही |अविनाशी म्हणजे नासत नाही| नित्य म्हणजे असते नेहमी||५५||

अनंत म्हणजे अंत नाही| निर्जात म्हणजे जन्म
नाही|विशाल म्हणजे आखुड नाही| अखंड
म्हणजे खंड नाही||५६||

निनाद म्हणजे नाद नाही| निस्संदेह म्हणजे
संदेह नाही | निर्विकल्प म्हणजे विकल्प
नाही|परमात्मा म्हणजे साऱ्यांचा परमोच्च
आत्मा||५७||

ऐसी परब्रम्हाची महती| संत नेहमी सांगती|
श्रुतीही सांगती| तरी ऐको नये काय ?||५८||

अशा निर्गुणाशी वरिता| सद्गुरू म्हणता| दया क्षमा शांती निर्विकारता निर्विकल्पता| या येती पोटी||५९||

दया भक्ती प्रीती शक्ती| या नणंदा जावा भेटती| भाव विश्वास समाधान आनंद हे पुत्र होती | विवेक वैराग्य बंधू दीर सहाय्ये||६०||

अष्टसिद्धी मोक्षलक्ष्मी| काल परमेश्वर कुंडलिनी माया दास – दासी होती|चार देहांचे

उडनखटोले येती| परी विचारांचे तर्कांचे पंख तुटती परब्रम्हापुढी||६१||

परी निर्विकारते क्षमा- शांती निर्विल्पतेचे समीरे| उडोन तखती या परब्रम्ह नभावरे | भेटेल ते नभांतच||६२||

नभ कैसे निर्मळ| नभ  कैसे निश्चळ| नभ कैसे निर्भेद| न भेदता यावे||६३||

निर्भेळ म्हणजे एकचि असणे| गगन म्हणजे नेहमी निश्चळ असते| न डोळियां दिसणे |म्हणून न नासणे|म्हणून हे परब्रम्ह||६४||

गौर मेघे भूते म्हणजे  गौरांग| कृष्ण मेघ भूते म्हणजे कृष्णांश| तेजाअभावे म्हणजे श्यामांगे|तेजात पित दिसणे ||६५||

पिंड म्हणजे पृथ्वी|बम्हांड म्हणजे खरे अवकाश| सारे पावता नाश|निष्वर्ण दिसते||६६||

आकाश आणि अवकाश एक|परी  उपाधी
अनेक| परंतु रूप एक| जाणावे||६७||

ग्रहसुर्यमाले व्यापिले| म्हणून अवकाश
बोलिले | निर्विकार दिसले म्हणून आकाश
बोलिले| हे ब्रम्हांड काढिले| हे निर्विकार
परब्रम्ह पाहावे||६८||

परब्रम्ह  काय जाणता | अतर्क्याचा म्हणजे
जयाचा  तर्क न येतो करता | अशाचे चिंतीता|
बुद्धी होणे कुंठिता |  साहजिकच आहे||६९||

याचे चितंनाये| बुद्धीची तर्काची विचाराची क्षमता काई | उपयुक्त नाही | अत: हयागत होऊनी चिंतावे||७०||

हे ब्रम्हज्ञान जाणण्यास कठीण | सांगण्यास कठीण | परब्रम्हाची जाण| स्वरूप जाणतावाचून येत नाही||७१||

आत्मज्ञान  म्हणजे स्वरूपज्ञान| आत्मज्ञान म्हणजे म्हणजे आपण कोण| याची जाण| हेही खरे ज्ञान| होता सारं माने समान| हेही असे महान| ऐकावे||७२||

आत्मा कैसा दिसतो|आत्मा कैसा
असतो|आत्मा कैसा  नांदतो| पंचतत्वी
देहांत||७३||

आत्मा असे चंचळ| शाश्वातानंदे अचळ|
निर्विकारी निराकारी, निर्मलानंदी असे ईश्वराचे
बाळ| नित्य पुरातन अनंत शाश्वत||७४||

आत्मा करी सर्वत्र भ्रमण| स्थूल अन्  सुक्ष्म
त्याचे  वाहन| अजन्माचे नीळबिंदुत स्थान|  हा
देहांत कारण||७५||

आत्मा कसे | म्हणूनी स्थुळास महत्त्व असे|
नाहीतर नासे| गिधाडे त्याभोवती घेरत||७६||

आत्मा जगण्यासाठी चैतन्य|  म्हणूनी देह
कारण| चार देहांतील  मुख्य जाणावा||७७||

तयाचे प्रमाण  अंगुष्ठ जाण| तयाचा पित वर्ण|
अवस्था तुर्या जाणावी||७८||

तो आत्मा अनाहतातला हरी| जाणावा प्रकृती
तरी|तुर्या त्यांची कांता||७९||

प्रकृति तयाची माता| जगज्जोति  तयाचा पिता|
‘सोहम्' त्याची सुता| ही नातेवाइके
जाणावी||८०||

स्थूल सूक्ष्म महाकारण| तयाचे बंधू-भगिनी
जाण| कांतुला करी मानपान। अनाहताकडे
येता || ८१||

जागृती स्वप्नाली अर्धतुर्या याचे भ्रातृजाया
जाण| अकारा मकारा ओंहकारा याचे पुतण्या

जाण| तुर्य याचे उपाधी जाण| जाले कांतेवरुन नामकरण| प्रकृतीची महती वोळखावी||८२||

तुर्या ही जगांत कांता महान| वोपभोगोन न तृप्ती जाण| वोपभोगत तिस जीवन| घालवावे||८३||

थोरले दोनांस | देई वापरायांस|संग दीराचे करावयांस। कांता आपुली||८४||

तुर्या म्हणजे देहांत विदेही जाण| देहातीत गमन| आसक्तीस देई मरण| सदा आत्मांत विलीन| ही अवस्था प्राप्त करावी||८५||

सोहम् म्हणजे अर्धमात्रा| तोच अच्युत आपण
हे सुत्रा| तीच आत्मपुत्रा । कानी चित्त हे
आणोन ऐकावे||८६||

तुर्य म्हणजे आत्मा जाण| जयाकडे जाता खरे
ज्ञान| आसक्ती जाई मरोन| शाश्वतेचं
भान|आपोआप येती||८७||

यांचे थोरले भावां वोळखोन | त्यांस मागे
सारोन| त्याविना याचे मिलन| होतच नसे||८८||

नागीन जागीण निद्रिण | तुर्यीन अर्धतुर्यीण| या पांची भगिणी जाण| यांचे मानमान| केल्यावाचून  परब्रम्हाकडे जावोच नये||८९||

एक नागीन| तोडांत शेपटो घेवोन| वेटोळे घालोन| खुशाल आळसोन| पहुडते मुलाधारांत||९०||

तिचे नाम कुंडलिनी जाण|  तिच कुमारी षोडशी जाण| माळीणीकडे जावायचे द्वार साधन| जाणावे||९१||

जरां हात लावता| शक्ती संचारता |नागीण दंश करता | जाते प्रत्येक चक्रास||९२||

सात कमळे आपुले चक्षु उघडतील| अनंत कोटी प्रकाश उलगडती| ताराचंबळ उलटी सत्रावीचे आसने  गडगडती| नादी कान लागती | घंटारथ भूकंप सारे ||९३||

ब्रम्हरंधे जाता| नाणीव वळवळता | सहस्त्र चक्षु उघडता| सुंदर अमृतवाली येते|| ९४||

हाती कलशिका धरोन| अमृत भरोन| जिव्हेंवर
टाकोन| पोट भरिते||९५||

न हिस कांत कांता| पूर्ण नपुंसकता| पुरुष व
प्रकृता। ओहमकारा हीही अर्धसुता| नाव
सत्रावी इचे||९६||

अर्ध जागृती अर्ध तुर्या| दोंही पुढे होती
भांडावया | पुढे अर्धवट व्हावया| उभया
होती||९७||

नपुंसकासी संग करोन | द्वेषभाव ना सरोन|
दोंही मिळोन| जागृती विरोन| अर्धतुर्या
उरती||९८||

नपुंसकांचे वीत प्रमाण| तेजस् नामकरण|
तेजावरोन होवान | ब्रम्ह प्राप्ती करविती.||९९||

ओहम् म्हणजे मी नाही| तेजांत विऱोन गेले
हाय| आता सत्रावी माझी माय| उदरभरण
करील||१००||

सात कमळे | जाणीव कळे| सत्रावीची अमृत फळे| कुंडलिनीचे तळे| आत्माचे मळे| यांचे मूळ मूलाधार||१०१||

हे ज्ञान अपार| वेदशास्त्र लोणच्याचे खार|  हे जाणिता परब्रम्हापाशी तार| आपुली पोचते||१०२||

ब्रम्हज्ञान अन् आत्मज्ञान हेच खरे सार| वेदांहूनी अपार| हे जाणिता देहाची कुरकुर| काय उरणार?||१०३||

हे ऐकोनि प्रचीतीस आणावे| चिंतोन
मनोभावावे| तर्क न भावावे| या खऱ्या
ज्ञानासाठी||१०४||

शक्ति वचनांचा अंगीकार| देह-मन जाणीव
जळोनी त्याच्या खऱ्या ज्ञानाचा अंगार| मारोनी
षड्-चोर| हाही महान ज्ञानी||१०५||

इति श्री शक्तिवचने उत्तम  ज्ञातालक्षणे पूर्ण
जाले जाण| ब्रहात्मज्ञान| त्याचे अनुभवन|
चिंतने घ्यावे||१०६||

# चक्रदर्शन

पूर्वी वर्तिले ज्ञात्याचे लक्षण| आता करते
चक्रदर्शन| कुंडलिनीचे विकार दमन| अति
पवित्र महान| जाणावे||१||

पुरुषांस धरोन| श्रुतीत  लिहोन| मूलाधाराचे
स्थान| शिश्नात जाण| मग स्त्रियांचे कोठे?||२||

योगसाधनेत वेदाभ्यासात|ध्यानसाधनेत
ओंकारोच्चारात|  अगोचरी खेचरी मुद्रांत|
स्त्रियांचे स्थान का नाही ||३||

पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रिया न समान| याचे मूळ कारण |सात पिढ्या डोके धरोन| कळलेच नाही||४||

जने आशंका विचारली| तत्क्षण शक्ती उत्तरली| चक्रांविषयी||५||

योगसाधनेत पार्वती, लीलावती ब्रम्हवादिनी आदी स्त्रिया महान| वेदाभ्यासात गार्गी, मैत्रयी, सरस्वती, घोषाला, आर्या जाण| ध्यानसाधनेत पार्वती, लोपामुद्रा, ललिता, षोडषी महान|

खेचरी अगोचरी मुद्रांची जननी पार्वतीच
जाणावी||६||

जो मानी स्त्रिया न समान| तो मूढ अजाण|
साऱ्यांत नांदणारा 'एकच' यांचे न भान|
त्यालाच||७||

पुरुष नि प्रकृति न एक| वायु नि जाणीव एक|
तिथे स्त्री-पुरुष भेद| काय उरिला||८||

पुरुष नि प्रकृती न वेगळे| सारे त्यांचेच सोहळे|
तिस गुणांचे डोहाळे| त्रिदेवांत पाल्हाळाले||९||

प्रकृती म्हणजे वायु| पुरुष म्हणजे जाणीव
आयु| दोंहो एक वासती देहांत बहु| हे
जाणिजे||१०||

जैसे मुलाधाराचे स्थान शिश्नात| तैसेच योनीत|
कुंडलिनी दोहोंत| भेद न करी||११||

वेटोळे घालूनी नागिणीगत| नागिनीच आहे
स्वयंजात| बैसली मूलाधारीं
निद्रीस्त|होऊनी||१२||

स्वयंचि योगमाया| परमानंद दिधते साधकांसी
अनुभवाया| तीच निद्रिस्त झालीया| कैसे||१३||

करूनी व्यक्तीवरी माया| आणयूनि विकारांची
छाया|असेलचि तो स्वयं साधक तर तयासी
परिक्षाया| तीच कुंडलिनी||१४||

होतां शक्तिपात| गुरुचा मस्तकावर न्यासताचि
वरदहस्त| परमेश्वराची कृपा असेल नितांत|
तरीचि जागृत होईल कुंडलिनी||१५||

प्रथमत: वळोनी सरळ| सोडवोनी कुंडल|
तत्रस्थानीच गोल फिरते अंमळ|
मुलाधांरात||१६||

मूळ आधार| अर्थातच मूलाधार| चक्र हे
असते प्रथम प्राकार| योनी अथवा शिश्नात
असे हे जाण||१७||

पुरुष असो अथवा स्त्री| उभयांची
आध्यात्मिक प्रगती समान होती | हे असावे
ध्यानी| पूर्वग्रह न बाळगता||१८||

जैसा देवै आराधनेचा मार्ग| भक्ती, ध्यान ,कर्म, ज्ञानयोग| तैसेचि प्राथमिक अनुभूतींचा हृदयी होई प्रयाग| हर्षे ,भावविवशता  ऐसे काही||१९||

हे चक्र होताचि जागृत| ज्ञान,प्रतिभाशक्ती, सर्जनशीलता,भक्ती,व कर्म, शक्तीचे मूळ होते निर्मित| म्हणोनीच ‘मूलाधार ‘हे नाम स्वयंसिद्ध ठरिले सत्यार्थात| याहूनीच चाले प्रवास पुढचा||२०||

प्रथम हाचि टप्पा वाटे सुलभ | किंतु अन्
नसाया हवे विचलित, नसावे मनी  मळभ|
अन्यथा परमज्ञान होईन दुर्लभ| म्हणोनी मन
स्थिर ठेवोनि ऐशा प्रवासास आरंभ
करावा||2१||

यापुढे प्रवास खडतर जाण| परंतु प्रथमचि
आरंभ यदि असेल उत्तम तर पुढील  टप्पे
होतील काहीसे सुलभ| प्रत्येक चक्रातील
प्रवास.||२२||

प्रथमतः व्हाल आपण सर्व अननुभूत| अनुभव
-अनुभूति नाही जाणवत| परीक्षा असतात
अनुस्यूत| म्हणोनि न होता विचलित साधना
चालू ठेवावी||२३||

गुरुवरी ठेविता श्रध्दा| मानूनि शिरोधार्य तया
शब्दा| ईश्वरचि निर्मितो प्रारब्धा| ऐसा भाव
सदैवचि असावा||२४||

गंगा वाहिली नव्हे -उलटी कुंडलिनी चालिली
तेंत|प्रपात जाई मणिपूरात| स्वाधिष्ठानासी मागे
सोडूनी||२५||

मणिपूर चक्राचे स्थान| पदाच्या घोटयात जाण|
अन्य मान्यतानुरुप ओटीपोटात मणिपुराचे दल
महान| ऐसे वर्णिले आहे चक्र मणिपूर||२६||

मणिपूराचे दल चत्वार| शक्तीचा विमुक्त संचार|
शक्ति प्रकटे साकार| मणिपुरात प्रवेशे
कुंडलिनी||२७||

सोमचक्राचे सोळा दल सोळा| चौसष्ट कलांचा
सोहळा|  मणिपुराचा शक्तीप्रप्रात करे दलांशी

मोकळा|मणिपुर च सोमचक्रातील हा संपर्कचि
आगळाचि  म्हणावा||२८||

सोमचक्र म्हणजे हृदयाचे दल| मणिपूर ही कैसे
असेल त्यांनी विदल ? जैसे दुग्धासी संपर्किता
दुग्धासी माने 'वयस्य' असूनि जळ निश्चल|
तैसेचि मणिपुरात दौडताचि शक्तीलहरी
सोमचक्राचे दल उघडती||२९||

मणिपुरात स्वीकार प्रधान| मानितां
ओटीपोटातील स्थान| दैवविधान करे ग्रहण|

ऐसा साधक उलगडवितो समग्र सोमचक्राचे दल||३०||

मणिपुरात धैर्य शक्ती प्रधान| मानितां पदांच्या घोटातले स्थान|विपदांसी करे रणकंदन| ऐसा साधकांचा प्रवास चालिलां स्वाशिष्ठानकडे झटिती||३१||

स्वाधिष्ठानाचे नामाभिधान| जाहले कैश्यावरून| हे घ्यावे सत्वर जाणून| महता स्वाधिष्ठान चक्राची||३२||

स्वाधिष्ठानचे स्थान| नाभी अथवा नाभीमध्यात
जाण| जेथून होतो वैखरीचा, परेचा ऐश्या
वाणींचा जन्म महान| जेथूनि नाळही जुळते
जीवात्म्यासी||३३||

शेषावरी पहुडला असता विष्णु रमाकांत|
तयाच्या नाभीतूनी कमल जाहले निर्मित|
सृजनकारी सृष्टीचा रचनाकर्ता ब्रह्मदेव जन्मला
तयांत| हे सृजनाचे प्रतीक||३४||

नाभीतूनीच श्वासांचा होतो जन्म| तेथेचि जाण
पचनाचे मार्ग|ओंकारही उमटतो ‘नाभीच्या

द्वारातूनी अन् ओष्ठांतूनी खर्ज| ध्वनी,वाचा,
श्वसनाचे करी व्यवस्थापन||३५||

स्वाधिष्ठानाचे स्थान नाभीत| म्हणूनी साधकाने
समय करावा व्यतित| नूतन काहीतरी सृजन
करण्यात| नूतन नूतन ज्ञान मिळविण्यात
चिंतनात सदा||३६||

तद्नंतरी येते ते अनाहत| जे असते हदयी
स्थिती|ज्याचा नाद ‘ओमकार ‘आहे साक्षात|
ऐसे अनाहत चक्र||३७||

अनाहत म्हणजे जे कधीही न होई आहत|
संपूर्ण चैतन्याचा स्त्रोत| विष्णु-रमेचे स्थान प्रिय
अत्यंत| ऐसे अनाहत ते||३८||

नाद गुंजते हदयात, मनात, अनाहतात| विभीन्न
नाद होई अनुभूतित| कुंडलिनी जेव्हा
अनाहतात प्रवेशत||३९||

अनाहताचे स्थान| हदयातचि
जाण|आत्माचेही-मनाचे परमात्मास्वरुप असते
विराजमान|सदासर्वथा||४०||

तद्नंतरी कुंडलिनी प्रवेशते विशुध्दात|
विशुध्दाचे स्थान कंठात| विभागले सोळा
दलांत| ऐसे ते विशुद्ध||४१||

विशुध्दाचे कंठात स्थान| तेंत वाणीची उदात्तता
जाण| 'म' काराचा नाद होतो महान|
'ओ'मकारातील अंतिम 'म' शीर्ष होत
असे||४२||

विशुध्दात कंठे वाहे रसप्रपात| तारा अमृत
कलश करत राहे प्रवाहित| श्वसनाविना

सहस्त्रारातूनीही करे प्राणरस अन्वेक्षित| सिध्द
समाधिस्थ असतां मास-न्-मास||४३||

विभिन्न स्वाद विभिन्न रसांची अनुभूती| रस
विशुध्दांतूनी वाहती| इच्छेनुरुप पदार्थ रसाने
होई तृप्ती| विनाअन्ने होई पोषणदेखील||४४||

प्रवेशता कोल्हाटीण विशुध्दांत| जणू कंठ
लागतो फुटत| नाद मुखातूनी उमटत| स्फुरे
शब्द-नाद सकळ||४५||

तद्नंतरी शक्तीने ‘आज्ञा’ केली| सगळी
व्यवस्थित बैसली| तशी शक्ती वदली| देत
आज्ञाचक्राचे स्पष्टीकरण||४६||

आज्ञाचक्र हा टप्पा शेवटचा| परमात्मा ही
मिलन होण्याचा| प्रवास निरंतरचि असे किंतु
अंत असे समग्र जाणिवांचा| ऐसे हे
आज्ञाचक्र||४७||

आज्ञाचक्राचे स्थान| तृतीय नेत्रांत जाण|
प्रवेशतांचि तेंत कुंडलिनी लागिते ध्यान|
निर्विकार चित्त होते, निरसते भान||४८||

संभवतः दिव्यदृष्टीचा, किंबहुना आत्मदृष्टीचा
होतो साक्षात्कार| कल्पने दृश्य होते साकार|
ध्यानात तेज दर्शन, अथवा दिसे परमेश्वर|
परमात्माही घडवू शकतो||४९||

संभवतः ऐसे का म्हटले| कोणीतरी
शक्तीसंवादमध्ये विचारिले| प्रश्न-पृच्छन केले|
शक्तीने उत्तर दिधले झटिती||५०||

संभवतः म्हणण्याचे कारण| अनुभव,
नेणिवेची जाणीव, गुरुकृपा, आराध्याची कृपा,
साधकांची मनस्थिती किंबहुना साधनेचे

समयक्षण| यांवरही निर्धारित होतो जाण|
परमात्म्याशी किंवा दिव्यदृष्टीचा लाभ||५१||

दोन दळांचे हे चक्र| स्वयं तृतीय नेत्र| अन् यांचे
दळ ही नेत्रचि जाण| जसा त्रिनेत्रांनी शिवतत्त्व
अथवा सावित्रीतत्व होते शरीरे उत्पन्न||५२||

हे स्थान 'ओमकारा'तील 'उ' काराचे जाण|
नाद हा एकचि तरीही तया स्पंदने सत्य-
कल्पित दृश्ये उमटती नेत्रपटलांवर महान|
किंबहुना मनचक्षुवरी अंतचक्षुवरीही
उमटती||५३||

ज्या  समयी असते कुंडलिनी आज्ञाचक्रात|
त्याक्षणीच तेजाचे आगमन होतसे नेत्रांत|
कदा-कदा न साहवते ऐसे तेज-पुंज|तत्समयी
एकचि उपाय जाणावा||५४||

उपाय काहीसा कठीण| चंचळ मनासी करेल
स्थिर जाण| अनाहतें कुंडलिनी असतां,
तत्समयी हा उपाय कराल, तर हा उपाय करेल
उत्तम अनुनूत प्रदान| ऐसा हा उपाय
जाणावा||५५||

हा उपाय आहे ‘ध्यान’| सर्व योगांमध्ये महान|
योगी-सिध्द-तपस्वींचे आराधनाचे मुख्य
साधन| ईश्वराची एकरुप होण्याचा हाही मार्ग
श्रेष्ठ||५६||

तया ध्यानाकारणे होते परमज्ञान| ईश्वर-आत्मा-
सृष्टीचे ज्ञान तथा होते सूक्ष्मातिसूक्ष्माचे दर्शन|
आज्ञाचक्राचे तेज घेता येते नेत्रें सामावून|ततीय
नेत्र होतो जागृत||५७||

ऐसे द्वय नेत्र तेजवंत होतां|तृतीय नेत्र जागृत होतां| कुंडलिनी उर्ध्वमार्गी अग्रसरित होतां| सहस्त्रारच्या दिशेने प्रवास होतसे||५८||

ज्ञात्याच्या लक्षणांत सत्रावी व षोडशरक्तपित्री विषयी जाणून घेतले होते विस्तृत| म्हणूनी तयाचे विवेचन संक्षेपात| जाणूया सहस्त्राराचे ज्ञान फक्त| यथार्थे||५९||

सहस्त्राराचे स्थान मस्तिकात| किंबहुना दळे उंच इतुकी की पोहचे ब्रम्हरंधात|प्रत्येक

पाकुळी न्हाऊन येते तेजें आरक्त| नांदते
मस्तकें||६०||

अस्फुट प्रकाश होतो प्रसृत| सूक्ष्म तेज:कण
होतात हे स्फुटित| सकारात्मक ऊर्जा होते
निर्मित| सहस्त्रारे ऊर्ध्वगामी||६१||

तारेची रससरिता| प्रतिभेची शब्दप्रसृता|
उद्यानातील सुंदर पुष्पलता|असती मस्तिष्कें-
उर्ध्वें||६३||

विभीन्न मेजवानी पुष्पें| सुगंधात ही उत्तम हे| प्रत्येक सुगंध- दिव्य-महान-दर्प-इतरे| नासिकेपर्यंत येती||६४||

सतरावा पुरुष व सतरावी प्रकृती| जाहली ऐसी सत्रावी| धारुनिया कलश हाती| स्वादाचे भांडार विशुध्दे प्रवाहित करीतसे||६५||

ब्रम्हरंधे सहस्त्र दळांवरी श्वेतबिंदू| तो आत्मा उष्णतेचा बंधु| तो चैतन्याचा सिंधु| कैसे तो जाणावा||६६||

अवकाश भ्रमणासमयी आत्मा यत्क्षणी करे
भ्रभण|तत्समयी करे श्वेतबिंदु मस्तके तयाच्या
उष्मा तथा ऊर्जेचे संयोजन| शरीरात करे
प्राणजीवनरसाचे वहन|सर्वे कार्ये शरीराची करे
सुव्यवस्थित||६७||

सहसत्राराच्या मध्यभागे वसत असे
परमात्मा,परब्रम्ह अंतिम सत्य,ऋत, नित्य| ऐसे
हे परमेश्वरतत्व मस्तकी असे स्थित|
सहसत्रदलांची वलये जयापरिते||६८||

तर कधी प्राप्त होते समाधीची अवस्था ?
अनाहते, विशुध्दे की सहस्त्रारे अशी आहे
शंका| समाधी तथा परमसमाधी किंबहुना
विकल्प, अविकल्प समाधीचे विवेचन द्यावे
सर्वथा| कोणी शंका पृच्छिली||६९||

त्यावरी शक्ती वदली| यत्क्षणी कुंडलिनी
अनाहते वा विशुध्दे प्रवेशली|यदि ईश्वरकृपा
अपुल्याकडे वळिली| तत्समयी आरंभिक होते
समाधीची अवस्था||७०||

अनाहत, विशुध्दापासूनी समाधीची प्रारंभिक
अवस्था होते आरंभित|सहस्त्रारासी पोचिता
कुंडलिनी ब्रम्हरंधात| होतां परमज्ञान प्राप्त|
परमसमाधी होते अनुभूति||७१||

परमसमाधी म्हणजे उच्च कोटीची समाधी|
जिसी  नसे कोणतीही उपाधी|
परमानंद,परमज्ञान,परमतेचा अनुभव होई ऐसी
ती महासमाधी| साधकहो,आपण सर्वांनी
जाणावी||७२||

सविकल्प समाधी असते विचार ,स्थल,काल,
अवकाश, अंतरंगासंबंधित| सविकल्प ने
शाश्वतानंदाहूनी प्रश्न अधिक| तरीही त्या
प्रश्नांच्या शोधात| आनंद मिळेजे||७३||

अविकल्प समाधीत असते एक अंतहीन,
अमर्यादित, अनंत ऐसे आत्मा-परमात्मास्थान|
ईश्वराशी एकरुप होण्याचे परमानंद| आत्मा
परमात्माशी एकात्म होतां अनुभव होतो उत्कट
महान| ऐसे विवेचन शक्तें स्पष्ट केले||७४||

मात्र मनुजनहो ! एक असू द्या लक्षात| एकवार सप्तचकाचा प्रवास होतां पूर्ण| कुंडलिनी न होतां निद्रिस्त| प्रवास चालू ठेवते||७५||

इति श्री शक्तिवचने चक्रदर्शन पूर्ण जाहले जाण| सप्तचक्रातील अनुभवून| सहस्त्रारातील परमज्ञान| मनी उतरवूनी घ्यावे||७६||

## परिशिष्ट

१) दशक :- निरूपणाच्या प्रथम अध्यायात दश देवतांचे स्तवन केले जाते,त्यालाच ‘दशक’ म्हणतात.

२) प्रथम अध्यायात, दुसऱ्या चरणानंतर आलेल्या संस्कृत श्लोकांचा अर्थ :- कारण मला स्वर्णमयी लंका स्वीकार्य नाही, लक्ष्मणा! (कारण) माता व मातृभूमी स्वर्गापेक्षा श्रेष्ठ आहे.”

३) रेवड:- फाटलेल्या किंवा जुन्या कपड्यांना गोंडे लावून सुशोभित करणे.

४) भूयिष्ठ :- (येथे अर्थ) अनेक रूपांत वास करणे.

५) सुष्ठ:- उत्तम, महान

६) सोर्याहूनि :- सूर्याहून

७) निश :- एक चकाकता धातू

८) धृष्ट:- धैर्यवान व संयमी

९) १५ व्या चरणानंतर आलेले संस्कृत श्लोकांचा अर्थ:- गुरूचरणी सदैव वंदन असो. त्या चरणांचे मला विस्मरण कधी न घडो.हे गुरू,तू ज्ञान व तेजाचा महान निधि असून

तू दयाळू आणि तपस्वी आहेस. तू दिवसरात्र आपल्या शिष्याच्या हिताचे चिंतन करतोस.( म्हणून) गुरूचरणी सदैव वंदन असो. तू कुंभार, तर मी माती, तू मूर्तिकार व मी पाषाण आहे. तुझ्या हातून माझ्या व्यक्तिमत्त्वाची निमिर्ती घडते आहे. त्या हातांचे विस्मरण न घडो.

१०) दौष्यंती:- दुष्यंताचा पुत्र

११)चरण क्र.२२ नंतर आलेल्या संस्कृत श्लोकाचा अर्थ:- भार( तेजस) ला तोलून धरणारा म्हणून ‘भारत’, वैदिक लोकांनी व्यापलेला देश म्हणून ' आर्यदेश’, संस्कृतीचे मूळ म्हणून येथे ' संस्कृत भाषेचा जन्म झाला, पवित्रतेचे स्थान म्हणून ' हिन्दुस्थान' ही भारताची विभिन्न नावं आहेत.

१२) मनु- शतरुपे :- ब्रम्हदेवाची संताने :- स्त्री पुरुषांना निर्माण करणारे.

१३) एक सत्:- आद्य तत्व, आदिशक्ती

१४) ३० व्या चरणा नंतर आलेल्या संस्कृत श्लोकाचा अर्थ :- वेद, गीता, रामायण व, सत् , महाकवी वेदव्यासाशिवाय भरतराष्ट्राची महत्ता कसली?

१५) चरण क्र.३१ नंतर आलेल्या संस्कृत श्लोकाचा अर्थ:-
जेथे जन्म- मृत्यू व पालनपोषण असे संपूर्ण जीवन व्यतीत होते, ती कर्मभूमी का होऊ शकत नाही, सौमित्रा?

१६) त्रयगुणे:- सत्त्व,रज, तम

१७ )चरण क्र.४४ नंतर आलेल्या संस्कृत श्लोकाचा अर्थ:-
वीणा व पुस्तक धारण करणाऱ्या, कमळावर आसनस्थ असणाऱ्या, शुभ्र वस्त्र परिधान करणाऱ्या, व कला- विद्या प्रदान  करण्याऱ्या शारदास्वरूप सरस्वती देवीला माझा प्रणाम असो.

१८ )चरण क्र. ४५ नंतर आलेल्या संस्कृत श्लोकाचा अर्थ :-
आकाशातून पडणारे पावसाचे पाणी जसं शेवटी सागराला मिळते, तसेच सर्व देवांना केलेले नमस्कार ईश्वराला पोचते.

१९)५६ वा चरण :- उपनिषदांना ‘ वेदांत' असेही म्हटले जाते.

उत्तम प्रपंचाचे लक्षण

२०) अवस्थातीत:- देहाच्या अवस्थेपलीकडे

२१) विदेह :- देहाच्या जाणिवेपलीकडे

२२) असार:- जे ग्रहण करू शकत नाही असे.

२३ )हर्यक्षापरी:- सिंहासारखे

२४)चरण क्र.१८ चा अर्थ:- येथे मयसभेतील आख्यायिका सांगितली आहे. ज्यात पांडवांना सर्वत्र कृष्णदर्शन घडते.

२५ )चौर्यता:- चोरी

२६) मृगया:- शिकार

२७ )दारा:- पत्नी

२८ )अत: - म्हणून

२९) उरो:- मांडी

३०) चत्वारशत लक्ष:- चारशे लाख

३१) कर्तृत्व:- (येथे अर्थ) कर्माचे कर्तेपण

३२) रुदणे:- रडणं, दु:ख करणे.

३३) षोडशरक्तपित्री:- सोळा रक्तबिंदू व पीतबिंदूंतून बनलेला परमात्म्यांश ( सहस्त्रारातील)

ज्ञात्याचे लक्षण

३४) असाराचे वमन:- अग्रहणीय सोडून देणे

३५) दंतलोमनखांचे:- दात, केस व नखं

३६) धनंजय:- धनाला जिंकणारा ( येथे अर्थ) धनाच्या आसक्तीला जिंकणारा

३७ )कालंजय:- मृत्यू किंवा काळावर विजय प्राप्त करणारा

३८) रूज्जंय:- रोगांवर नियंत्रण मिळवणारा

३९ )मृत्तिकाकला :- मातीनं शिल्प घडवण्याची कला

४०) तडितनिर्मिण:- वीजनिर्मिती

४१) श्रव्यातीताश्राव्य:- ऐकू येता येणारा, कमी व जास्त वारंवारतेचा ध्वनी

४२) जम्णिचा:- जन्मीचा

४३)अस्तु:- असो.

४४) चत्वार:- चार

४५ )मानसात:- मनात

४६) अजन्माचे:- ज्याचा जन्म झाला नाही, अशा आत्माचे

४७) निळबिंदूत:- आत्म्याचे वाहन नीळबिंदु असते.


४८) कांतुला:- पत्नीची बहीण
४९ )नागीण:- योगनिद्रा
५०) जागीण:- जागृतीची अवस्था
५१ )माळीणीकडे:- सत्रावीकडे
५२) तेजस:- सहस्त्रारातील तेजबिंदू


चक्रदर्शन मधील

५३) दमन:- नियंत्रण
५४) तिसगुण:- तीन गुणांचे तीस गुणांत विभाजन
५५ )अनुनूभूत:- अनुभूती न येणे
५६) अनुस्यूत:- समाविष्ट असणे
५७) सोम चक्र:६ ह्रदयातील चक्र
५८ )आहत:- विचलित
५९) ब्रम्हरंध:- मस्तकाच्या उर्ध्वभागी
६०) अन्वेक्षित:- पाठवणे
६१)अनुनूत:- अत्यंत उत्कट

# निकिता पाटील यांची ई साहित्यवर प्रकाशित पुस्तके




पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर क्लिक करा

**ई साहित्य प्रतिष्ठानला तेरा वर्षं पूर्ण झाली.**

**निकिता पाटील यांचं ई साहित्यचं हे चवथं पुस्तक.**

निकिता राजेश पाटील ही मूळची डोंबिवलीची असून सद्यकालात तिचे वास्तव्य काही वर्षांपासून वांगणीत आहे. कुटुंबात लेखनाचा वा साहित्याचा वारसा असा नाही. पण अगदी शालेय वयातच तिला लेखनाची ऊर्मी शांत बसू देईना. वयाच्या तेराव्या वर्षापर्यंत तिने पूर्ण पुस्तक होईल इतके लिहिले. नंतर मराठी साहित्याचा रितसर अभ्यास करून आता ती साहित्याच्या वेगवेगळया रसांच्या निर्मितीचा अनुभव घेत आहे. तिने लिहिलेल्या पहिल्या तीनही पुस्तकांचे कौतुक वाचकांनी केले आहे. सध्या ती आपल्या पाचव्या पुस्तकाच्या तयारीत आहे.

असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. पण त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकविक्रीबद्दल प्रकाशक साशंक असतात. जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आली नाही तर त्यांचे नांव प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या. पण आता इंटरनेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत नेण्याचे काम अनेक संस्था करत आहेत.

ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ६ लाख वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही

कोणताही खर्च नाही. भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्यासाठी ई साहित्यचे प्रयत्न चालू आहेत. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, कुमार सोनावणे, प्रतिक उकले, सुजाता सिद्धा, गायत्री रोडे, मनोज कळमकर, काजल दळवी, सचिन बोरसे, कार्तिकी भट, डॉ. प्रितम दरवडे, अमोल गवळी, निकिता पाटील,

संजीवनी देशपांडे, अंकिता शिंदे, काजल दळवी असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?